### महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी

# प.पु.पप्पाजी यांचे महिला गृह उद्योगाला उत्स्फुर्त प्रतिसाद

। सुधागड ।

दि. २७ (प्रतिनिधी)

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्ट्या शक्षम बणविण्यासाठी त्यांना काम उपलब्ध करून देण्याच्या कल्पनेतून श्रमीक नारी संघाची स्थापना करण्यात आली या महिला सुरवातीस दोन महिलांच्या माध्यामातून गुजराथी आहारातील खाकरा पदार्थ बणविण्याच्या कामास त्यांनी सुरवात केली. आज या व्यावसायाचे रूपांतर महिला गृह उद्योगात झाले असल्याचे श्रमीक नारी संघाच्या संचालिका सिमी बापर यांनी सांगितले.

महिला गृह उद्योगाचे उद्घाटन हे प.पु.पप्पाजींच्या प्रमुख उपस्थितीत उद्योगपती बीपीन बाविसी व निशा बाविशी यांच्या हस्ते या महिलांना पुरस्कार देण्यात आला. यावेळी संचालिका सिमी बापर, मिता हेमाणी, पुनिता अजमेरा, शिल्पा शहा, श्रृती शेठ, प्राणलाल शहा, बिनीन सावला, यांच्यासह आश्रमातील सदस्य उपस्थित होते. यावेळी महिला गृह उद्योगाच्या उत्पादनाचे नाव 'ब्रॅन्ड नेम चाक्री' असे ठेवण्यात आला. चाक्री म्हणजे सेवा असा अर्थ होतो या उद्योगात दिवाळीसाठी लागणारे दिवे सुकामेवा पॅकींग, चॉकलेट पॅकींग, असे उत्पादन महिला उद्योगात घेतले जातात. या उत्पादनाला आज देशभर मागणी आहे. विकासाच्या दृष्टीने एक हजार महिलांना काम मिळेल व आंतरराष्ट्रीय स्तरावर श्रमीक नारी संघाचे नाव अभिमानाने घेतले जावे असे प.पु.प्रविण मेहता यांनी सांगितले.



महिला गृह उद्योगातील महिलांसाठी स्वतंत्र बसची व्यवस्था करण्यात आली असून दुसऱ्या बसचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अत्यंत दुर्गम भागात वाडयापाडयात आरोग्य सेवा देण्याच्या माध्यमातून आश्रमामार्फत, फिरता दवाखाना सुरु करण्यात आला. त्याला प्रचंड प्रमाणात प्रतिसाद बघता परळी येथे क्लिनिक उघडण्यात आले. कान, नाक, घसा, त्वचारोग श्वसन रोग अशा विविध आजारांवरील सेवा देण्याचे काम प्राथमिक आरोग्य केंद्र आश्रमामार्फत सुरु करण्यात असल्याची माहिती डॉ. हेता ग्रोशर यांनी दिली.